दैनिक दिव्य मराठी

# रसिक

'रसिक'मधील लेख वाचा
http://epaperdivyamarathi.bhaskar.com

रविवार, २३ ऑक्टोबर २०११ वेध बहुरंगी जीवनाचा


०३

नवे थर्ड वर्ल्ड
राजा पटवर्धन

०५

भाकरी आणि स्वातंत्र्य आणि पर्यावरण
कुमार केतकर

०८

'मराठी'ची किंमत किती?
नम्रता भिंगार्डे


# दीप की ज्योत जले सुभग री...

उद्या धनत्रयोदशी. प्रकाशपर्वाची सुरुवात. या निमित्ताने कुमार गंधर्वांनी बांधलेल्या काही खास बंदिशींबद्दल सांगत आहेत कुमारजींचे शिष्य आणि संगीताचे गाढे अभ्यासक सत्यशील देशपांडे.



आपल्याकडे दिवाळीच्या वेळी गाण्यांच्या मैफलीची जुनी परंपरा नाही. पूर्वी म्हैसूरच्या दरबारात दसऱ्याच्या निमित्ताने गाणं होत असे; परंतु त्या गाण्यात शब्दांना महत्त्व नव्हतं, केवळ सुरांना होतं. उदाहरणार्थ 'पैया पडूंगी, पलखा न चढूंगी' ही वास्तविक पाहता अतिशय करुण रचना. एक अल्पवयीन मुलगी विनंती करतेय, 'पाया पडते तुमच्या, पण मी शेजेवर येणार नाही.' ही किंवा अशा प्रकारच्या बंदिशी अशा प्रसंगी गायल्या जायच्या आणि त्याची मोठी प्रशंसाही व्हायची. आपल्याकडे गाण्याच्या शब्दांकडे लक्ष दिले जात नाही, गायकांना वाटते, किंबहुना त्यांचा असा इगो असतो की आम्ही शब्दांच्या पलीकडले आहोत. अर्थात, गाण्याचा मुखडा तासभराच्या गाण्यात अनेकदा गायला जातो, तो काही समोरचा श्रोता मतिमंद आहे आणि त्याला त्याचा अर्थ कळावा की पिया घर आए अथवा नहीं आए म्हणून नव्हे, हेही खरेच; पण जाताजाता त्या शब्दांना अर्थ असेल त्या बंदिशीचा दर्जा वाढतो व सोन्याला जणू सुगंध येतो.

उदा. सुख कर आई पिया के संग ही काही ओरडून सांगायची गोष्ट आहे का; पण केसरबाईंच्या सुरांमध्ये हरवून जातो.

काही काही बंदिशी ऐकल्यावर मला शिरीषताईंची एक हायकू आठवते, नका रे धरू चिमटीत, फुलपाखराचे नाजूक अंग, अजून दुखतोय पंखावरचा रंग. इतक्या त्या अर्थपूर्ण आहेत; पण कधी या बंदिशींचा अर्थ जाहीररीत्या गाण्यासारखा नसतो किंवा त्याच्याकडे गायकाने लक्ष दिलेलं नसतं, त्यामुळे ते दिवाळीनिमित्त झालं किंवा कुणाच्या पुण्यतिथीनिमित्त, काय फरक पडतो?



या परिस्थितीतून मार्ग काढला तो कुमारजींनी, कुमार गंधर्वांनी. उदाहरणार्थ त्यांची एक बंदिश आहे, उडा दे पतंग मारा... बंदिशी एरवी सासू, नणंद किंवा बाकी निसर्गवर्णन यांतच संपतात; पण ही बंदिश आहे संक्रांतीनिमित्त पतंग उडवायला शिकव, असं सांगणाऱ्या एका लहान मुलीची. किंवा 'मीठा बोला हम सब आज' हा टप्पा त्यांनी बांधला. तीळगूळ घ्या आणि गोड बोला हीच भावना त्यातून व्यक्त होते.

पण गालिबचा शेर इतका चांगला, अर्थपूर्ण असतो की तो गायला अडचण होते. त्यामुळे बंदिशी रचणं हे एक आव्हान आहे. एखाद्याला ज्ञानकोश पाठ असला तरी त्याला चांगली बंदिश रचता येईलच असं नाही. म्हणूनच मला कुमारजींच्या बंदिशींचं कौतुक वाटतं. उदाहरणार्थ त्यांनी धनबसंती म्हणजे पूरिया धनाश्रीतला धन आणि धनत्रयोदशीलाही धन आणि बसंत राग अशी एक बंदिश बांधली. दीप की ज्योत जले सुभगरी...

आणि एक बंदिश आहे 'मोतियन चौक पुराओ' म्हणजे मोत्यांची रांगोळी घाला. म्हणजे सिच्युएशन आणि तिचं चित्रण यात येतं. दिवाळीच्या निमित्ताने कुमारजींचे हे विचार आज मला आठवले.

> गाण्याचा मुखडा तासाभराच्या गाण्यात अनेकदा गायला जातो, तो काही समोरचा श्रोता मतिमंद आहे आणि त्याला त्याचा अर्थ कळावा की पिया घर आए अथवा नहीं आए म्हणून नव्हे, हेही खरेच; पण जाताजाता त्या शब्दांना अर्थ असेल त्या बंदिशीचा दर्जा वाढतो व सोन्याला जणू सुगंध येतो.

शब्द हे नखीसारखे असतात, टणत्कार किंवा स्वरतरंग उठवायला ते गायकाची नखी म्हणून काम करतात. शब्द म्हणजे स्वरांना टांगण्याच्या खुंट्या अशी समजूत फक्त महाराष्ट्रात; पण गाणंही फक्त महाराष्ट्रातच आहे. तिथे आग्र्यात आग्र्याला किंवा किराण्याला कोण विचारतो? तिथले गायक घराबाहेर पडले, जन्मगावं सोडली म्हणून त्यांची नावं झाली, त्यांची घराणी तयार झाली आग्रा, जयपूर, किराणा, इ.

आपल्याकडून वझेबुवा पायी ग्वाल्हेरला गेले, येताना विद्या घेऊन आले; पण त्यांचं भाषेचा अभ्यास करणं राहून गेलं. अजूनही आपल्याकडे वेगळी तालक्रिया आणि भाषेचा अभ्यास शिकवला जात नाही. कुमारजींसारखा गुरू असेल तर गोष्ट वेगळी. त्यांनी प्रत्यक्ष नाही शिकवलं तरी सहवासातून शिकणं होतंच. आणि भाषेवर प्रेम करणं काही त्रासदायक नसतं. तिचा फायदाच होतो.

कुमारजी शाळेत गेले नव्हते; परंतु त्यांनी स्वतःला सुजाण संपन्न बनवलं होतं वाचनातून. शब्दांपलीकडचे समजल्याने



तुमची संवेदनाशक्ती बोथट होत जाते, काय होतंय हे कळत नाही, हा व्हायरस संपूर्ण जीवनाला व्यापून टाकतो. त्यामुळे तुमच्या जगण्यावर परिणाम होतो. विचारप्रक्रिया थांबते, मला काय करायचंय ही भावना वाढीला लागते. म्हणून आपण म्हणू शकतो, केसरबाई काय गायल्या? तर, सुख कर आ... पण त्या गायल्या असतात सुख कर आई पिया संग. आपण सुख कर आ म्हणतो कारण 'आ'वर सम येते.

किंवा आपण म्हणतो गोकुल गा... पण पूर्ण बोल आहेत, गोकुल गाव का छोरा, बरसाने की नार... त्यातही लोकांना वाटतं बरसाने की नार, बरसाना म्हणजे पावसाशी संबंध असेल. पण राधा बरसाना या गावची आहे, हे आपल्या ध्यानात येतच नाही. म्हणूनच सदारंगांच्या बंदिशी छान आहेत, कारण त्यात सिच्युएशन आहेत.

(शब्दांकन : मृण्मयी रानडे)



## टूटे जो सो सपन

उस्ताद आमीर खान यांची एक रचना 'लागे ना मनवा, मोरे मितवा' साडेदहाव्या मात्रेपासून सुरू होते. मग आम्ही साडेनवव्या मात्रेपासून सुरू होणारी एक रचली. 'टूटे जब सपन, जाना तब है सपन, बिछुडन या मिलन, साच क्या, क्या सपन, टूटे जो सो सपन.' स्वप्न पडत असताना मनपटलावर काही सबटायटल्स येत नसतात, हे स्वप्न आहे म्हणून. म्हणून ते तुटतं तेव्हा कळतं की ते स्वप्न होतं.

## घुसळून तयार होणारा पक्का रंग

मी रचलेली एक बंदिश आहे 'निरख रंग निकु, घोल निजघट तू'. (लाल रंग पळसाच्या पानांचा करतात, तो घोळूनच करतात. ज्याने स्वतःला 'चर्न' केलंय, घुसळलंय तो त्याचा पक्का रंग आहे.) 'चढे तो रंग लागे फिको औरन के घट, घोल निजघट तू.' (दुसऱ्याचा रंग घेतलास तर तो चढला तरी फिकाच दिसणार.)



## पगला गंदे, पगला गंदे

पं. भीमसेन जोशी एकदा गात होते, पगला गंदे, पगला गंदे. श्रोते विचारात पडले, हे असे वाईट शब्द कोणाला उद्देशून गात आहेत. प्रत्यक्षात शब्द आहेत 'पग लागन दे महाराज कुंवर'. अर्थात ते महाराजाला/सरदाराला खुश करण्यासाठी लिहिलेलं आहे, हे सरळ आहे.

# !! श्री शेअर बाजार प्रसन्न !!





संतोष काळे

शेअर बाजारातील सर्वच व्यवहार ऑनलाइन झाल्यामुळे आणि व्यवहाराची प्रिंट आउट कॉम्प्युटरकडून मिळत असल्याने लक्ष्मीपूजनाला चोपडी ही फक्त टोकन म्हणून वापरली जाते. पूर्वी तर शेअर सर्टिफिकेटही पूजेत ठेवले जायचे. आता त्याऐवजी डिमॅटच्या स्टेटमेंटची पूजा केली जाते...

दीपावलीच्या दिवशी लक्ष्मी धनरूपी पावलांनी यावी अन् सारे घर वैभव आणि सुखसमृद्धीने भरून जावे, अशी प्रत्येकाचीच मनोकामना असते. लक्ष्मीपूजन आणि शेअर बाजाराचे नातेही असेच काहीसे आहे. विशेष करून लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सायंकाळी होणारे चोपडी पूजन आणि त्यानंतर होणाऱ्या मुहूर्ताच्या सौद्यांना पूर्वीपासून अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेअर बाजारातील व्यवहाराच्या नोंदणीची जागा आता चोपडीऐवजी ऑनलाइन व्यवहाराने घेतलेली असली तरीही लाल रंगाच्या चोपड्यांना आज तमाम ब्रोकर मंडळींच्या मनात आजही मोठे स्थान आहे.

ज्याप्रमाणे हिंदू नववर्षाचे स्वागत गुढीपाडव्याने होते, अगदी त्याचप्रमाणे शेअर बाजाराच्या नवीन आर्थिक वर्षाचे स्वागत मुहूर्ताच्या सौद्यांनी केले जाते. रंगीबेरंगी मनमोहक मांडलेल्या रांगोळ्या, पणत्या, आकाशकंदील शेअर बाजारात येणाऱ्या लक्ष्मीचे स्वागत करण्यासाठी सज्ज असतात. छोटे - मोठे शेअर दलाल, गुंतवणूकदार आपल्या कुटुंबीयांसमेवत नटूनथटून, नवीन वस्त्रे परिधान करून बाजारात येतात. शेअर बाजाराच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर जणू काही दिवाळीचा कौटुंबिक आनंद मेळावाच भरतो म्हणा ना.

या पहिल्या मजल्यावर जमून एकत्र लक्ष्मीपूजन करणे ही बाजाराची वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा. त्यातही शेअर्सच्या खरेदी-विक्री व्यवहाराची नोंद ठेवणारी खातेवही अर्थात चोपडीला विशेष धार्मिक महत्त्व असते. लक्ष्मीपूजनाला सर्व शेअर दलालांच्या चोपड्या एकत्र करून त्यांची सुंदर मांडणी केली जाते. त्यानंतर मग पंडिताकडून मंत्रपठण करून लक्ष्मी तसेच या चोपड्यांची विधिवत पूजा केली जाते. येणारे वर्ष भांडवल बाजाराला लाभदायक ठरो, अशी प्रार्थना करून सर्व ब्रोकर मंडळी या पूजाअर्चेमध्ये रममाण होऊन जातात. या वेळी दोन तास होणाऱ्या मुहूर्ताच्या सौद्यांचीही वेगळी खासियत आहे. पूर्वीच्या काळी बोलणी करून मग एका रिंगणात (ज्याला क्राय सिस्टिम्स असेही म्हणतात) मुहूर्ताचे सौदे व्हायचे. खरेदी - विक्री करणारी ब्रोकर मंडळी पहिल्या मजल्यावरील ठरावीक काउंटरवर ठराविक समभागांचे सौदे करतात. दीर्घ मुदतीची गुंतवणूक नेहमीच लाभदायक असते हे लक्षात घेऊन मुहूर्ताच्या सौद्यांमध्ये समभागांची टोकन खरेदी केली जाते. नवीन वर्षात जास्त कमाई होणार नाही असे वाटणारे गुंतवणूकदार विक्री करतात तर जास्त कमाई होईल असे वाटणारे खरेदी करतात. मुहूर्ताच्या सौद्यांमध्ये कॉर्पोरेट ब्रोकर्सचा (२५ टक्के) सहभाग जास्त नसला तरी रिटेल गुंतवणूकदारांचा (७५ टक्के) सहभाग लक्षणीय असतो. विदेशी गुंतवणूकदार संस्थांना मुहूर्ताच्या सौद्यांशी फारसे काही देणे घेणे नसते. मुहूर्ताचे सौदे झाल्यानंतर ब्रोकर्स मंडळींचे कुटुंबीय दिवाळीच्या शुभेच्छा देऊन मिठाईने तोंड गोड करतात. ब्रोकर कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना मिठाईबरोबरच 'बोनस'रूपी लक्ष्मी देऊन प्रसन्न केले जाते.

चोपडीपूजन आणि मुहूर्ताच्या सौद्यांना महत्त्व असले तरी १९९९मध्ये पेपरलेस ट्रेडिंग सुरू झाले आणि ही परंपराही काहीशी बदलत गेली. पूर्वी दिवाळी ते दिवाळी असे शेअर बाजाराचे लेखावर्ष होते; परंतु आर्थिक वर्षाची पद्धत सुरू झाल्यामुळेही हा ट्रेंड काहीसा बदलला. आता प्रत्येकाकडे कॉम्प्युटर आल्यामुळे ब्रोकर्स मंडळी आपापल्या कार्यालयात कुटुंबासमवेत पूजा करतात. पूर्वीच्या काळात मुहूर्ताच्या सौद्यांच्या वेळी चोपडीला कुंकू लावून मग त्यातील पानावर लाल शाईने सौदे लिहिले जायचे. या सौदा व्यवहाराचा अहवाल त्यानंतर संगणकात साठवला जायचा. मग स्टेटमेंट तयार करून सौदापूर्ती पूर्ण व्हायची. त्या वेळी सौदापूर्तीचा कालावधी साधारण १५ दिवसांचा असायचा. हल्लीच्या ऑनलाइन व्यवहारामध्ये शाई दिसत नाही. फक्त स्क्रीनवर निळा दिवा दिसला तर खरेदी आणि लाल दिवा दिसला तर विक्री इतकेच समजते. महत्त्वाचे म्हणजे आता तर सकाळी घेतलेला संध्याकाळपर्यंत डिलिव्हरीमध्ये परावर्तित झालाच पाहिजे असा नियम आहे. सगळेच व्यवहार ऑनलाइन झाल्यामुळे चोपडी ही फक्त टोकन म्हणून घेतली जाते. कारण सगळ्या व्यवहारांची प्रिंट आउट संगणकाकडूनच मिळते. त्यामुळे चोपडीला महत्त्व जरी असले तरी त्यात व्यवहार नोंद मात्र क्वचितच होते. पूर्वी तर

> मुहूर्ताचे सौदे झाल्यानंतर ब्रोकर्स मंडळींचे कुटुंबीय एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा देऊन मिठाईने तोंड गोड करतात.



शेअर सर्टिफिकेटही पूजेत ठेवले जायचे. आता त्याऐवजी डिमॅटच्या स्टेटमेंटची पूजा केली जाते. परंपरा काहीशी बदललेली असली तरी चोपडीबद्दलच्या भावना मात्र आजही तशाच कायम आहेत हे विशेष.

मुहूर्ताच्या सौद्याचा सकारात्मक वा नकारात्मक कल हा त्या आठवड्यातील घडामोडींवर अवलंबून असतो. उदाहरण द्यायचे तर २००५-०६ वर्षाच्या दिवाळीतील मुहूर्ताच्या आदल्या दिवशी एका बड्या सिमेंट कंपनीने तिमाहीमध्ये खराब आर्थिक कामगिरी केली.

- पान ८ पाहा

बॉलीवूडचे साम्राज्य ५००० कोटींचे... पान ८ पाहा